महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५२ वे | दिनांक : २६/०५/२०२६ | वार : मंगळवार

## जलव्यवस्थापनासाठी राज्य सरकारचे मोठे पाऊल; 'पाण्याचा सातबारा' सुरू



**मुंबई :** पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर 'पाण्याचा सातबारा' देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत आज मंत्रालयातील बैठकीत याबाबतचे भक्कम पाऊल टाकण्यात आले.

जलव्यवस्थापन करणाऱ्या 'अक्वेरियम' या संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी 'सातबारा' उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाते. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्वेरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे 'वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क' आणि 'वॉटर बॅलन्सशीट'ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. या प्रणालीमुळे ग्रामपंचायत किंवा पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा, आवक, जावक आणि शिल्लक पाणी याचा पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल.

मंत्रालयातील महसूल विभागात आज झालेल्या बैठकीला पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पलकुंडवार, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापडकर यांच्यासह एक्वेरिएम संस्थेचे प्रमुख सुब्रमण्या कुसनूर, आयआयटी बॉबेचे जल अभ्यासक डॉ. अविनाश कदम, आर्थिक विषयाचे अभ्यासक उदय नायर यावेळी उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर पाण्याचे संवर्धन करणाऱ्यांना 'अक्वाक्रेडिट्स' च्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे ग्रामीण भागात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकपणे होईल, व भविष्यात एक मोठी 'वॉटर इकॉनॉमी' उभी राहण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र राज्य हा प्रयोग राबविणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांचे बनावट सोशल मीडिया खाते तयार करून फसवणुकीचा प्रयत्न




**सोलापुर :** वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सायबर विभाग नागरिकांना यूपीआय आणि ऑनलाइन बँकिंग व्यवहारांबाबत सातत्याने सतर्क करत आहे. मात्र, तरीही डिजिटल अरेस्ट आणि सोशल मीडिया अकाऊंट हॅक करून भावनिक मेसेजद्वारे पैशांची मागणी करण्याच्या घटना थांबलेल्या नाहीत. यात आता सर्वसामान्यांसह उच्चपदस्थ अधिकारीही सायबर भामट्यांचे लक्ष्य होत असून, नुकतेच सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तीकेयन एस. यांच्या नावाचा, पदाचा आणि छायाचित्राचा गैरवापर करून व्हिएतनाम व थायलंडमधून बनावट सोशल मीडिया खाते तयार करत नागरिकांची दिशाभूल करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांच्या बनावट सोशल मीडिया खात्यावरून काही व्यक्तींकडे पैशांची मागणी केली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानंतर, त्यांनी स्वतः सायबर सेलकडे याबाबत तक्रार दाखल केली असून पोलिसांचा तपास सुरू आहे. यावर स्पष्टीकरण देताना जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांच्याकडून किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नागरिकांकडे अशी कोणतीही आर्थिक मागणी केली जात नाही. त्यामुळे या बनावट खात्यावरून येणाऱ्या संदेशांना नागरिकांनी बळी पडून स्वतःची फसवणूक करून घेऊ नये आणि अशा कोणत्याही संशयास्पद प्रकारांची त्वरित माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

या बनावट व्हॉट्सअॅप खात्यावर जिल्हाधिकाऱ्यांचे नाव, छायाचित्र आणि "Collector & District Magistrate" असे पदनाम वापरून नागरिकांचा विश्वास संपादन करण्याचा आणि त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न सायबर भामट्यांकडून करण्यात आला आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, अशा प्रकारे फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

**साताऱ्यात आंतरराष्ट्रीय टोळीला अटक**

दरम्यान, साताऱ्यातील सायबर विभागाने अवघ्या दोन दिवसांपूर्वीच ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय टोळीला गजाआड करत त्यांच्याकडून मोबाईल, लॅपटॉप आणि रोकड जप्त करण्याची मोठी कारवाई केली होती. ही घटना ताजी असतानाच, आता थेट जिल्हाधिकाऱ्यांचेच बनावट सोशल मीडिया खाते तयार करून त्याद्वारे पैशांची मागणी केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने सर्वत्र मोठी खळबळ उडाली आहे.

## इंधन टंचाईबाबत अफवांवर विश्वास ठेवू नका : डॉ. प्रवीणकुमार देवरे

**बुलढाणा :** राज्यातील काही भागांत निर्माण झालेल्या इंधन टंचाईमुळे पेट्रोल पंपावर नागरिकांच्या मोठ्या रांगा लागल्याचे चित्र असताना, बुलढाणा जिल्ह्यातील परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची दिलासादायक माहिती जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रशासनाची भूमिका स्पष्ट करत, जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला सुरळीत इंधनपुरवठा करण्याची हमी प्रशासनातर्फे घेतली जात असल्याचे महत्त्वपूर्ण आश्वासनही दिले आहे.

बुलढाणा जिल्ह्यात ज्या ठिकाणी इंधन टंचाई जाणवत आहे, तेथील महसूल अधिकाऱ्यांकडून माहिती मिळताच इंधन कंपन्यांशी संपर्क साधून प्रशासनाकडून तत्काळ इंधनपुरवठा केला जात आहे. या तात्काळ उपाययोजनांमुळे सध्या जिल्ह्यातील इंधन टंचाईची परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आली असून, इंधनाचा काळाबाजार करणाऱ्यांवरही प्रशासनाची करडी नजर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही टंचाईला न घाबरता आपली शेतीची आणि मशागतीची कामे विनाअडथळा सुरू ठेवावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

परभणी जिल्ह्यात गेल्या १० दिवसांपासून भेडसावणारी डिझेल टंचाई अद्यापही कायम असून, शहरातील बहुतांश पेट्रोल पंपांवर डिझेल संपल्याने थेट 'नो स्टॉक'चे फलक झळकत आहेत. डिझेलच उपलब्ध नसल्याने पंपांवरील गर्दी ओसरली असून, वाहनधारकांना इंधनासाठी एका पंपावरून दुसऱ्या पंपावर वणवण भटकावे लागत आहे. या तीव्र टंचाईचा सर्वाधिक फटका ट्रॅक्टर, मालवाहू वाहने, खाजगी बसेस आणि जनरेटरवर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांना बसत आहे. प्रशासन आणि तेल कंपन्यांकडून इंधन पुरवठा सुरळीत करण्याचे दावे केले जात असले तरी, प्रत्यक्ष परिस्थितीत कोणतीही सुधारणा न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ मे २०२६

## गुन्हे अन्वेषण करताना जात धर्माचा विचार करता कामा नये - प्रा. किरण सगर




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** गुन्ह्याचा तपास करत असताना जात धर्म पंथाचा विचार मनात येऊ नये असे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे माजी राज्य सरचिटणीस प्रा.किरण सगर यांनी मांडले.विमलाई फाउंडेशनच्या वतीने मेरीट मेसर्स कोचिंग क्लासेसच्या सभागृहात पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया दिलिप सगर यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिलन पुदाले हे होते.मंचावर जेष्ठ समाजसेविका सविता सगर, सुप्रिया सगर,भागवत सगर ,दिलिप सगर, अंजली सगर,माणिकवार, महेश जाधव,मिरा सगर आदी उपस्थित होते.पुढे बोलताना प्रा सगर म्हणाले की; पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असताना अन्यायग्रस्त उपेक्षित वंचित घटक नजरेसमोर ठेवून योग्य पध्दतीने भुमिका घ्यावी.कर्तव्य बजावतानां भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून कार्य करावे.कुठल्याही कसल्याही आमिषाला बळी न पडता भलाईने आणि सचोटीने प्रामाणिकपणे तसेच पारदर्शकपणे आपले पद व त्याची प्रतिष्ठा सांभाळून कार्य करीत रहावे असे त्यांनी सांगितले.सुप्रिया सगर हिने परिस्थितीवर मात करत, घर आणि मुलांची जबाबदारी सांभाळून चिंचकोट (ता. उमरगा) येथील सुप्रिया दिलीप सगर यांनी 'एमपीएससी' (MPSC) परीक्षेत यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदाला गवसणी घातली.असे प्रास्ताविकात विजय सगर यांनी माहिती दिली. त्यांच्या या यशाबद्दल 'कै. विमलाई श्रीमंतराव सगर सोशल फाउंडेशन'च्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सुप्रिया सगर या सध्या नांदेड जिल्ह्यातील भोकर पोलीस ठाण्यात सेवेत कार्यरत आहेत.सुप्रिया सगर यांचे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागात झाले असून, त्यांनी उमरगा येथील श्रमजीवी कॉलेजमधून बी.एससी. (B.Sc.) पदवी पूर्ण केली. एका शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी हे यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या दोन्ही लहान बहिणी देखील सध्या महाराष्ट्र पोलीस दलात सेवा बजावत आहेत. या सत्कार समारंभात सुप्रिया यांच्यासह त्यांच्या माता-पिता व पती भागवत सगर यांचाही गौरव करण्यात आला.परिस्थिती कधीच अडचण बनू शकत नाही - PSI सुप्रिया सगरसत्काराला उत्तर देताना आणि उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुप्रिया सगर भावूक झाल्या. त्या म्हणाल्या, "कोणतेही ध्येय गाठताना परिस्थिती कधीच अडचण बनू शकत नाही. मनात चिकाटी, निश्चित ध्येय आणि अभ्यासात सातत्य असेल तर यश नक्की मिळते. मी स्वतः लहान मूल असताना, कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून हे यश मिळवले आहे."मातोश्रींच्या सविताआई सगर यांच्या सह सत्कार करताना प्रा.सगर यांनी सत्कार मुर्ती सुप्रियास सगर यांना कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' आणि संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर निर्मित 'भारताचे संविधान' हे भेट देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. विजय सगर यांनी केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन स्वाती वाडीकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री. ज्ञानेश्वर माणिकवार सर यांनी मानले. या सोहळ्याला क्लासेसचे विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुचाकीस्वारांना कारची पाठीमागून धडक; पती-पत्नी जखमी

**दौलताबाद (जावेद अहमद) :** धुळे—सोलापूर महामार्गावरील करोडी टोलनाक्याजवळ सोमवारी दुपारी ११:४५ वाजेच्या सुमारास कारने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात पती-पत्नी जखमी झाले आहेत.या अपघातात अंकुश जित्ते (वय ३५) व सरुजा अंकुश जित्ते (वय ३१, रा. गोळेगाव ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर) हे जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, अंकुश जित्ते हे पत्नी सरुजा यांच्यासह स्प्लेंडर दुचाकी (क्र. एमएच २० एफ एच १६६१) वरून करोडी येथून गोळेगावच्या दिशेने जात होते. त्यावेळी पाठीमागून भरधाव वेगात येणाऱ्या कारने (क्र. के ए ०२ एम यू ०८८८) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही रस्त्यावर पडून जखमी झाले.अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थेच्या रुग्णवाहिकेतून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

## उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**बीड, (भगवंत पाळवदे) :** मा. भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांच्या दिनांक १८/०५/२०२६ रोजीच्या पत्रानुसार, महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केलेला आहे. त्यानुसार उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची मराठी व इंग्रजी प्रारूप मतदार यादी दिनांक २२.०५.२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रारूप मतदार यादी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायती यांच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच धाराशिव जिल्ह्याच्या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रारूप मतदार यादीबाबत आक्षेप / दावे / हरकती असल्यास दिनांक २९.०५.२०२६ पर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी, उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ तथा जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या कार्यालयात किंवा जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायती यांच्या कार्यालयात अथवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी धाराशिव / लातूर / बीड यांच्या कार्यालयात सादर कराव्यात.

तसेच उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची प्रारूप मतदान केंद्र यादीही संबंधित कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

प्रारूप मतदान केंद्र यादीबाबत आक्षेप / दावे / हरकती असल्यास दिनांक ३१.०५.२०२६ पर्यंत संबंधित कार्यालयात सादर कराव्यात.

निवडणूक निर्णय अधिकारी
उस्मानाबाद-लातूर-बीड
स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ
तथा जिल्हाधिकारी धाराशिव






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ मे २०२६


## बंडू झाला शहाणा

भेळ आणि पाणीपुरी
बंडूला आवडायची खूप
कपाटातील पैसे घेऊन
विकत घ्यायचा गुपचूप

कधी घ्यायचा कॅडबरी
तर कधी क्रिमबिस्कीट
जेवायला बसल्यावर
चालायची सदा किटकिट

पोटभर जेवत नसल्याने
अंगात होता रोड
आईला नेहमी म्हणायचा
रोज रोज हवे गोड

नेहमी प्रमाणे बंडू
एकदा जेवायला बसला
ताटातील पदार्थ पाहून
गालातल्या गालात हसला

भाता ऐवजी होती भेळ
पोळी ऐवजी होती पाणीपुरी
भाजी ऐवजी होते बिस्किटे
वाटीभर होती कॅडबरी

आवडीचे जेवण पाहून
बंडूला आनंद झाला खूप
पण कितीही खाल्ले तरी
पोटातील कावळे बसेना चूप

त्यादिवसापासून बंडूला
कळाली आपली चूक
वरण, भात,भाजी, पोळीचे
जेवण करू लागला खूप




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## घटना दुरुस्ती शिवाय आरक्षण कसे देणार?गॅझेटीयर प्रकरण न्याय प्रविष्ट असतांना त्याची अंमलबजावणी कशी करणार?

**पुणे (प्रतिनिधी) :** मराठा आरक्षणाचा विषय असेल किंवा मराठा समाजाच्या उन्नतिचे प्रश्न असतील या प्रश्नांची उकल कायदेशीर व घटनात्मक पद्धतीने होऊन उन्नतीचा शास्वत मार्ग शासनाने काढावा म्हणुन आरक्षणाची मर्यादा वाढविण्या शिवाय पर्याय नाही म्हणुन आता दिल्लीत केंद्र शासनाकडे मागणी करण्या साठी दिल्लीत आंदोलन करणार असल्याची आणि घटना दुरुस्ती शिवाय आणि आरक्षण मर्यादा वाढविल्या शिवाय ते कसे देणार? त्याच प्रमाणे विविध गॅझेटीयर बाबत ते रद्द करावे या साठी गॅझेटीयर अंमलबजावणी स्थगित करावे म्हणुन हे प्रकरण न्याय प्रविष्ट असतांना त्याची अंमल बजावणी कशी करणार? असा सवाल करून इतर महत्वाची माहिती पुणे येथील भरगच्च पत्रकार परिषदेत मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नाना साहेब जावळे आणि रमेश केरे पाटील यांनी पुणे येथे दिली. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आम्ही आमच्या तज्ञ व जेष्ठ अभ्यासक ज्यांनी वयाची ३८ वर्षापेक्षा जास्त कार्यकाळ विविध आयोगा समक्ष सुनावणी मध्ये समाजासाठी घालवला ते आयोग म्हणजे शामसुंदर आयोग,खत्री आयोग, सराफ आयोग, बापट आयोग, भाटीया आयोग एवढेच काय तर केंद्र शासनाच्या जॉईंट पार्लीयामेंट कमिटी तसेच न्याय. रोहिणी आयोग तसेच नजीकचे न्यायमूर्ती एम जी गायकवाड आयोग, न्यायमूर्ती शुक्रे आयोग यांचे समक्ष एक एक बाब स्पष्ट करत मेहनती व परीश्रमाची कठीण अशी अभ्यासु वाटचाल करतांना घरावर तुळशी पत्र ठेवल्याची अभिमानाची बाब उभा महाराष्ट्र जाणतो ते सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालया तील मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते आणि आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते पाटील यांचे वतीने कायदेशीर व घटनामक मार्गदर्शन व्हावे म्हणुन एक पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन(पी पी टी )तयार करून ठेवले असल्याची माहिती भव्य पत्रकार परिषदेत आम्ही देत असल्याची बाब मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नाना साहेब जावळे आणि रमेश केरे पाटील यांन स्पष्ट करून अनेक समाजो पयोगी मागण्या त्यांनी केल्या असुन त्यात १)मराठा आरक्षणविरोधी याचीका आयोगाच्या निरीक्षणाच्या नोंदी न तपासताच आहेत असे प्रतिपादन आरक्षणाचे आमचे जेष्ठ अभ्यासक यांनी वेळो वेळी केले आहे. सदरच्या याचीकेत प्रमुख आक्षेप हा ५०% मर्यादा हा विषय प्रामुख्याने पुढे आला असुन कायदेशीर प्रश्न हा आहे की, न्यायमुर्ती सुनील सुक्रे आयोगाचा अहवाल व शिफारशी न तपासताच बहुसंख्य अंदाजावर आधारीत याचीका मुंबई उच्चन्यायालयात असल्याचे स्पष्ट होत आहे. ज्या इंद्रा सहानी निकालाचा सातत्याने संदर्भ दिला जातो त्याचा तपशील तपासता यात बरेच काही दडलेले असुन यथा योग्य बचाव केला तर या निकालातील अनुक्रमांक ८१० असे म्हणतो कि,"सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा साहनी निकालाच्या पॅरेग्राफ क्रमांक ८१० मध्ये असे म्हटले आहे की ५०% नियमांचे उल्लंघन करण्यासाठी राज्याने अत्यंत सावधगिरी बाळगली पाहीजे. न्यायालयाचा रेफरल साठी:५० % हा नियम असला तरी, या देशाच्या आणि लोकांच्या महान विविधते मध्ये अंतर्भूत असलेल्या काही विलक्षण परिस्थितींचा विचार करणे आवश्यक आहे.असे होऊ शकते की, दूरच्या आणि दुर्गम भागात राहणारी लोकसंख्या कदाचित मुख्य प्रवाहातून बाहेर असल्याच्या कारणास्तव राष्ट्रीय जीवन आणि त्यांच्या साठी विलक्षण आणि वैशिष्ट्य पूर्ण परिस्थिती लक्षात घेता, वेगळ्या पद्धतीने उपाय करणे आवश्यक आहे, या कठोर नियमात काही शिथिलता अनिवार्य होऊ शकते. असे करताना अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे आणि एक विशेष बाब तयार केली पाहीजे. "अशा बाबी स्पष्ट पणे नमुद असुन त्याचा तपशील जर का तपासला तर यात बरेच काही दडलेले असुन यथा योग्य बचाव केला तर या निकालातील अनेक अनु क्रमांकांचा फायदा घेणे शक्य असल्याचे प्रतिपादन आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासकांनी वेळो वेळी करून सुद्धा शासन अजिबात लक्ष देत नाही.२) सारथी संस्था अंत्यन्त दुरदृष्टीने भविष्यात सुद्धा कार्यरत रहावी म्हणुन आमच्याच तज्ञानी व जेष्ठ अभ्यासकांनी तयार केलेले अभ्यासु असे ट्रेनींग प्रोग्राम डिझाईन करून शासनास आमच्या मराठा समाजाच्या जेष्ठ अभ्यासकांनी आणि समन्वयकांनी दिलेले आहे. त्यावरच आज तगायात अंमल बजावणी झाली नाही.३)स्व. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आणि सारथी यांना एकमेकांशी " टाय अप " करून आणि त्यातील कर्ज वितरण पद्धती मध्ये अमूलाग्र दुरुस्ती करणे, मराठा समाजाच्या सर्वच स्तरातील विद्यार्थी,युवा वर्ग, शेतकरी,कष्टकरी, महिला वर्गाची आर्थिक उन्नती, शेतीसाठी उपयुक्त उत्पन्न वाढीच्या योजना आमच्या या जेष्ठ अभ्यासकांनी आणि समन्वयकांनी तयार करून ठेवल्या आहेत ते प्रत्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उप मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,उप मुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सदरचे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन(पीपीटी) पाहण्या साठी तात्काळ बैठकीचे नियोजन करून त्यात सुचवलेला शास्वात मार्ग मराठा समाजाच्या उन्नती व प्रगती साठी स्वीकारा वा अशी मागणी या पत्रकार परिषदेच्या माध्य मातून शासना कडे आम्ही करत असल्याचे प्रतिपादन अ. भा. छावा संघटनेचे अध्यक्ष आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नाना साहेब जावळे आणि आंदोलक तथा राज्य समन्वयक रमेश केरे पाटील यांनी केली असुन ४) मराठा आरक्षण विषयावर ज्यांचे कडे पुरावा आहे त्यांनी कुणबी जात प्रमाणपत्र मिळवणे आणि त्याची कायदेशीर पडताळणी होणे या साठी सोप्या पद्धती अवलंब करणे आदी बाबींची आमची मागणी असुन इतर कुठल्याही मार्गाने हे प्रश्न हाताळणे अयोग्य ठरणारे आहेत.यात मुख्य बाब माधुरी पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकारणात घटनापीठाणे घालून दिलेले निर्देश बदलणे, त्यात सुधारणा करणे, ते दुर्लक्ष करणे व नव्याने काही शासना देश किंवा शासनाचे परिपत्रक काढणे म्हणजे या निर्देशा चे भंग ठरेल म्हणुन या वर काढण्यात आलेला कायदेशीर व घटनात्मक मार्गच मराठा समाजाला न्याय मिळवून देऊ शकतो आणि नेमकी हीच बाब राज्य शासन का दडवून ठेवत आहे हाच मोठा प्रश्न महाराष्ट्रा तील जनसामान्य उपस्थित करीत असल्यामुळे राज्य शासनाने या बाबींचा गांभीर्याने विचार करून त्वरित बैठकीचे नियोजन करावे अशी मागणी आजच्या या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अ भा छावा संघटनेचे अध्यक्ष आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक नानासाहेब जावळे आणि आंदोलक राज्य समन्वयक रमेश केरे पाटील यांनी केले आहे.या पत्रकार परिषदेस अनेक मान्यवर समाज बांधव उपस्थित होते.

## सर्व कर्मचाऱ्यांनी ई-केवायसी पुर्ण करावी -जिल्हा कोषागार अधिकारी

**बीड (भगवंत पाळवदे) :** सर्व प्रशासकीय विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी-कर्मचारी यांनी माहे मे-२०२६ देय जुन-२०२६ च्या वेतन देयकाअगोदर ई-केवायसी पूर्ण करुन घ्यावी. ही ई-केवायसी पूर्ण करण्याअगोदर बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करुन बँक खाते अद्यावत करण्यात यावे, तसेच सेवार्थ प्रणालीत नोंदविलेला पॅन क्रमांक चूकीचा असल्यास, नोंदविण्यात आलेला पॅन क्रमांकाची दुरुस्ती करुन अद्यावत करावा. ई-केवायसी पूर्ण केल्यानंतर माहे मे-२०२६ देय जुन-२०२६ या महिन्याचे वेतन आहरीत करण्यात येतील, असे प्र. जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल** कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ मे २०२६


## जमीन नोंदणी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह; बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून फसवणुकीचा संशय...!




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर शहरात मृत डॉक्टरांच्या नावाने बनावट कागदपत्रांच्या आधारे भूखंड विक्रीचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात आरोपीला न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून या संपूर्ण घटनेमुळे जमीन खरेदी-विक्री प्रक्रिया, दस्तऐवज पडताळणी आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, मृत डॉक्टर जिवंत असल्याचे भासवून त्यांच्या नावाने बनावट आधार कार्ड आणि पॅन कार्ड तयार करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या बनावट कागदपत्रांच्या आधारे जिंतूर शहरातील सुमारे चार हजार चौरस फूट भूखंडाचा व्यवहार करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने स्वतःचा फोटो वापरून मृत व्यक्तीच्या नावाने कागदपत्रे तयार केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचे सांगितले जात आहे.हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संबंधित मृत डॉक्टरांच्या वारसांनी जिंतूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत प्रकरणाचा तपास सुरू केला. या प्रकरणात एकूण दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.तपासादरम्यान दस्त नोंदणी प्रक्रियेशी संबंधित मुद्रांक विक्रेते, दस्त लेखक आणि व्यवहाराशी संबंधित इतर व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी केली जात आहे. कागदपत्रांची पडताळणी नेमकी कोणत्या पद्धतीने झाली, व्यवहाराची प्रक्रिया कशी पार पडली आणि त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या का, याचा तपास पोलीस करत आहेत.या प्रकरणामुळे शहरात अनेक प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. विशेषतः "दस्त नोंदणी आणि गुंठेवारी, फेरफार करून देणारा दलाल कोण?" हा प्रश्न चर्चेचा विषय ठरत आहे. यासोबतच बनावट कागदपत्रांमध्ये फेरफार करण्यात कोणाची भूमिका होती आणि कागदपत्रांमध्ये बदल करून देण्यासाठी कोणाची मदत घेतली गेली का, याबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे. तपास यंत्रणांनी या मुद्द्यांचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.मात्र तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीबाबत ठोस निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नसल्याचे मतही व्यक्त होत आहे. पोलिस तपासानंतरच या प्रकरणातील सर्व बाबी स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, आरोपी रमेश नागरे यास न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून या प्रकरणातील इतर धागेदोरे शोधण्याचे काम सुरू आहे.या घटनेनंतर नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी जमीन व्यवहारांमध्ये अधिक काटेकोर दस्तऐवज पडताळणी आणि पारदर्शक प्रक्रिया राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## साधं सोपं जगणं

नको बांधू गड्या गळ्यात,
तू अहम पणाचं लोढण.
सदा सर्वदा असावे,
मस्त साधे सोपे जगणं. १

अहम पणामुळे सदा,
माणस जातात दूर.
माणसं दूर गेल्यावर,
येते की नयनात पूर. २

म्हणून म्हणतो माणसा,
असावे साधे जगणं.
माणुसकीने जगतांना,
सरळ असावे वागणं. ३

रिकाम्या हाती आलो,
रिकाम्या हातीच जाणार.
कितीही कमावले तरी,
दुसरेच वाटून खाणार. ४

जीवनाच्या प्रवासात,
गरजा असाव्यात कमी.
आनंदाने जगण्याची,
मिळणार तुला हमी. ५



**- नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क 9405109103

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology


Contact: 9405109103 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २६ मे २०२६


# द लुकिंग ग्लास : सामाजिक न्यायाच्या अंतर्विरोधांचा आरसा




**भा**रतीय संविधानाने सामाजिक न्यायाला दिलेले केंद्रस्थान हे आधुनिक भारताच्या लोकशाही प्रकल्पाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. भारतीय राष्ट्रराज्याची निर्मिती ही केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या आकांक्षेवर आधारित नव्हती; ती सामाजिक समतेच्या पुनर्स्थापनेच्या व्यापक ध्येयाशी जोडलेली होती. हजारो वर्षांच्या जातीय उतरंडीमुळे वंचित, बहिष्कृत आणि अमानवीय सामाजिक संरचनेत ढकलल्या गेलेल्या समुदायांना न्याय देण्यासाठी भारतीय संविधानाने आरक्षणासारख्या विशेष उपाययोजना स्वीकारल्या. त्यामुळे आरक्षणव्यवस्था ही केवळ शिक्षण किंवा नोकरीतील संधींचे वितरण करणारी प्रशासकीय योजना नसून भारतीय लोकशाहीच्या नैतिक बांधिलकीचे प्रतीक आहे. ती ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित समुदायांना राज्यसत्ता, संसाधने आणि सार्वजनिक संस्थांमध्ये प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न आहे. तथापि गेल्या काही दशकांत अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता, काही विशिष्ट जातींचे तुलनात्मक सक्षमीकरण आणि अनेक लहान उपजातींचे सातत्याने कायम राहिलेले उपेक्षित स्थान यामुळे "उप-वर्गीकरण" (Sub-classification) हा प्रश्न भारतीय सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला. अनुसूचित जाती हा एकसंध सामाजिक समूह असून त्यामध्येही सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्तरांमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे, हा मुद्दा विविध सामाजिक चळवळी, अभ्यासक आणि राजकीय गट सातत्याने मांडत आले आहेत. काही जातींना आरक्षणाचा अधिक लाभ मिळाला असून अनेक जाती अद्याप प्रतिनिधित्वाच्या कक्षेबाहेर आहेत, असा दावा उप-वर्गीकरणाच्या समर्थकांकडून केला जातो. दुसरीकडे, दलित समाजातील अंतर्गत विभागणी अधिक तीव्र करून सामूहिक राजकीय शक्ती कमकुवत करण्याचा हा प्रयत्न आहे, अशी टीका विरोधकांकडून केली जाते. सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणासंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर या चर्चेला अधिक तीव्र आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील क्षणी प्रकाशित झालेले द लुकिंग ग्लास: रिफ्लेक्शन्स ऑन द सुप्रीम कोर्ट जजमेंट ऑन सब-क्लासिफिकेशन ऑफ शेड्यूल्ड कास्ट्स हे पुस्तक समकालीन भारतातील सामाजिक न्यायाच्या चर्चेला अत्यंत महत्त्वपूर्ण वैचारिक दिशा देणारे ठरते.

'द लुकिंग ग्लास' (The Looking Glass) म्हणजे सोप्या भाषेत 'आरसा' किंवा 'दर्पण'. पुस्तकाच्या शीर्षकात हा शब्दप्रयोग योजण्यामागे केवळ शाब्दिक सौंदर्य नसून, त्यामागे एक अत्यंत सखोल आणि वैचारिक प्रयोजन आहे. अनुसूचित जातींच्या उप-वर्गीकरणावरील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करताना हा शब्द काही महत्त्वाचे अर्थ आणि पैलू समोर आणतो. आरशाचे मुख्य काम हे आपल्यासमोरील वस्तूचे वास्तव कोणतेही फेरफार न करता जसंच्या तसं दाखवणे हे असते. या पुस्तकाच्या संदर्भात, 'लुकिंग ग्लास' म्हणजे हे पुस्तक भारतीय समाज, न्यायव्यवस्था आणि राजकारणासमोर एक आरसा धरते. हा आरसा दाखवतो की, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही अनुसूचित जातींमधील सर्व उपजातींपर्यंत आरक्षणाचे लाभ समान रीतीने पोहोचलेले नाहीत. हा आरसा आरक्षणाच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय अपयश आणि राजकीय स्वार्थ या दोन्ही बाजूंचे उघडे नागडे वास्तव वाचकांसमोर आणतो. जेव्हा आपण आरशात पाहतो, तेव्हा आपण स्वतःचे परीक्षण करतो. या शब्दप्रयोगाचे दुसरे मोठे प्रयोजन म्हणजे आंबेडकरी चळवळ आणि दलित वर्तुळाला 'आत्मपरीक्षण' करण्याचे आवाहन करणे. उप-वर्गीकरणाच्या निर्णयामुळे दलित समाजात अंतर्गत वाद आणि फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे (उदा. माला विरुद्ध मादिगा, किंवा महार विरुद्ध मातंग, इतर उपजाती). अशा वेळी, हे पुस्तक चळवळीला आरशात पाहून स्वतःच्या अंतर्गत विषमतेवर, लाभांच्या वाटपावर आणि भविष्यातील एकतेवर विचार करायला लावणारे एक माध्यम ठरते. शीर्षकात पुढे 'रिफ्लेक्शन्स' (Reflections) हा शब्द आहे, ज्याचा अर्थ 'प्रतिबिंब' किंवा 'चिंतन/विचार' असा होतो. आरशात ज्याप्रमाणे वेगवेगळ्या कोनातून वेगवेगळ्या छटा दिसतात, त्याचप्रमाणे हे पुस्तक सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर देशातील प्रमुख विद्वानांचे, समाजशास्त्रज्ञांचे आणि कार्यकर्त्यांचे विविध वैचारिक दृष्टिकोन (सर्व बाजू) प्रतिबिंबित करते. यात केवळ न्यायालयाच्या निर्णयाचे समर्थन नाही, तर त्याचे दूरगामी राजकीय-आर्थिक धोकेही दाखवले आहेत. इंग्रजी साहित्यात लुईस कॅरोलची प्रसिद्ध कादंबरी आहे. *'थ्रू द लुकिंग-ग्लास' (Through the Looking-Glass)*, जिथे मुख्य पात्राला आरशाच्या पलीकडे एक पूर्णपणे उलटे आणि गुंतागुंतीचे जग दिसते. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाकडे पाहतानाही हाच संदर्भ लागू होतो. वरवर पाहता हा निर्णय 'मागे राहिलेल्यांना न्याय देणारा' (Substantive Equality साधणारा) वाटतो, पण जेव्हा आपण 'लुकिंग ग्लास'च्या पलीकडे जाऊन पाहतो, तेव्हा समजते की जागतिकीकरणाच्या काळात सरकारी नोकऱ्याच संपत चालल्या आहेत. अशा वेळी हा निर्णय मूळ आरक्षणालाच कमकुवत करण्याचा प्रस्थापित शक्तींचा एक छुपा अजेंडा असू शकतो. थोडक्यात सांगायचे तर सर्वोच्च न्यायालयाच्या या ऐतिहासिक आणि संवेदनशील निर्णयाकडे केवळ कायदेशीर चष्म्यातून न पाहता, त्यानिमित्ताने भारतीय समाजाचे, चळवळीचे आणि व्यवस्थेचे खरे रूप न्याहाळण्यासाठी आणि त्याचे सखोल चिंतन करण्यासाठी संपादकांनी 'द लुकिंग ग्लास' हा शब्दप्रयोग योजलेला दिसतो.

यागती चिन्ना राव आणि प्रियदर्शिनी विजयश्री यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात समाजशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, दलित अध्ययन, सार्वजनिक धोरण आणि सामाजिक चळवळींशी संबंधित विविध क्षेत्रांतील अभ्यासकांचे लेख समाविष्ट आहेत. हे पुस्तक केवळ सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे भाष्य नाही; उलट भारतीय आरक्षणव्यवस्थेच्या अंतर्गत असलेल्या ऐतिहासिक, सामाजिक, वैचारिक आणि राजकीय अंतर्विरोधांचे व्यापक विश्लेषण आहे. विशेषतः "सामाजिक न्याय" या संकल्पनेच्या बदलत्या स्वरूपाचा मागोवा घेण्याचा हा एक गंभीर प्रयत्न आहे. या पुस्तकाची प्रस्तावना आणि परिचय विभाग संपूर्ण चर्चेची वैचारिक चौकट स्पष्ट करतात. अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता ही नवीन बाब नसून आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या इतिहासात सातत्याने उपस्थित राहिलेली समस्या आहे, ही जाणीव संपादक करून देतात. तथापि, या विषमतेकडे पाहण्याचे दोन वेगळे दृष्टिकोन भारतीय सार्वजनिक क्षेत्रात विकसित झाले आहेत. पहिला दृष्टिकोन असा की अनुसूचित जातींतील काही प्रभावी उपजाती आरक्षणाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेत आहेत आणि त्यामुळे अत्यंत मागास उपजातींना पुरेशी संधी मिळत नाही. दुसरा दृष्टिकोन असा की उप-वर्गीकरणाच्या माध्यमातून दलित राजकीय ऐक्य कमकुवत केले जाऊ शकते. पुस्तकाचे महत्त्व या दोन प्रवाहांना समांतरपणे मांडण्यात आहे.

गुर्रम श्रीनिवास यांचा "द इव्होल्युशन ऑफ द इक्विटी प्रिन्सिपल इन द रिझर्वेशन पॉलिसी इन इंडिया" हा लेख पुस्तकातील वैचारिकदृष्ट्या अत्यंत मजबूत लेखांपैकी एक आहे. ते भारतीय आरक्षण धोरणातील "इक्विटी प्रिन्सिपल" चा ऐतिहासिक विकास मांडतात. आरक्षणाची संकल्पना सुरुवातीला प्रतिनिधित्वाच्या राजकारणाशी निगडित होती; मात्र पुढे "समान वाटप" आणि "अंतर्गत समता" यांचे प्रश्न पुढे आले. भारतीय संविधानातील समानतेच्या संकल्पनेचा प्रवास फॉर्मल इक्वालिटी पासून सब्स्टन्टिव्ह इक्वालिटी पर्यंत कसा झाला, हे लेखक प्रभावीपणे स्पष्ट करतात. हा लेख पुस्तकाच्या पुढील चर्चांसाठी एक सैद्धांतिक आधार तयार करतो. रोनकी राम यांचा पंजाबमधील परिस्थितीवर आधारित लेख विशेष उल्लेखनीय आहे. पंजाबमधील दलित समाजाची अंतर्गत रचना, विविध जातीय गटांतील सामाजिक अंतर आणि धार्मिक-सांस्कृतिक घटकांचा प्रभाव यांचे त्यांनी केलेले विश्लेषण उप-वर्गीकरणाच्या प्रश्नाला प्रादेशिक वास्तवाशी जोडते. हा लेख पुस्तकाला केवळ सैद्धांतिक चर्चेपासून दूर नेऊन सामाजिक वास्तवात स्थिर करतो. प्रकाश लुईस, वेंकटेश वाडित्य आणि संजीर आलम यांचे लेख "क्रिमिलेयर", आर्थिक निकष आणि सामाजिक बहिष्कार यांच्या प्रश्नांवर गंभीर चर्चा करतात. अनुसूचित जातींसाठी "क्रिमिलेयर" लागू करण्याच्या मागणीमागील तर्कशास्त्राचे परीक्षण करताना हे लेखक दाखवून देतात की जात हा केवळ आर्थिक प्रश्न नाही. सामाजिक प्रतिष्ठा, सांस्कृतिक भेदभाव, प्रतीकात्मक हिंसा आणि सामाजिक बहिष्कार या गोष्टी आर्थिक प्रगतीनंतरही कायम राहू शकतात. विशेषतः वेंकटेश वडित्य यांचा "कास्ट, पॉव्हर्टी अँड द क्रिमिलेयर : अ फॉल्टि एकॉनॉमिक अरग्युमेंट" हा लेख नवउदारमतवादी आर्थिक दृष्टिकोनावर प्रभावी टीका करतो. लेखकाचा मूलभूत युक्तिवाद असा आहे की आर्थिक निकषांवर सामाजिक न्यायाची व्याख्या केल्यास जातीय दडपशाहीचे ऐतिहासिक स्वरूप अस्पष्ट होते.

**संपादक: यागती चिन्ना राव आणि प्रियदर्शिनी विजयश्री**
**प्रकाशक: कनिष्क पब्लिशर्स, डिस्ट्रिब्युटर्स, नवी दिल्ली**
**वर्ष: २०२५ , किंमत: १५९५ ₹**




**प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना**